p.no.९८८

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/२८०/१४
पुणे १ दिनांक :- ०६/०९/२०१४

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
पोदार एज्युकेशन अँड स्पोटर्स् ट्रस्ट परेल मुंबई संचलित,
पोदार इंटरनॅशनल स्कूल ,मौजे उबाळेनगर ,वाघोली ता हवेली जि पुणे .

**विषयः-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भः-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि - १ दि.१५जून २०१३
३) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता / पुवि/१३/३१२२१/२४ दि.२ डिसेंबर २०१३
४) कार्यालयीन मान्य टिप्पणी दिनांक ०६/०९/२०१४

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २१४ | पोदार एज्युकेशन अँड स्पोटर्स् ट्रस्ट परेल मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कूल ,मौजे उबाळेनगर ,वाघोली ता हवेली जि पुणे | इंग्रजी | इ. १ ली ते ६ वी | जून २०१३ पासून | नवीन शाळा | प्राथमिक |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१४-१५ मध्ये सुरु असलेल्या वर्गांसह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/175/2020
पुणे 1 दिनांक :-18/2/2020

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**पोदार एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस ट्रस्ट,मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, उबाळेनगर, वाघोली, पुणे**

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय जा.क्र.एमआयएस-1017/प्र.क्र.183/एसएम-2, दिनांक-6.5.2017
3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.जा.क्र.शिउसं/प्राथ-2/स्वयंअर्थसहाय्यित/मान्यता/पुवि/2019/9202, दिनांक-3.2.2020

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक इ.6 वी इ.8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | पोदार एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस ट्रस्ट,मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कूल, उबाळेनगर, वाघोली, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई ) स्वयंअर्थसहायित | प्राथमिकला जोडुन ते उच्च प्राथमिक इ.6 वी ते इ.8 वी | 2016-17 |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन 2016-17 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय जा.क्र. एमआयएस-1017/प्र.क्र.183/एसएम-2, दिनांक-6.5.2017 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

17/2/2020
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

पुणे जिल्हा परिषद

# माध्यमिक शिक्षण विभाग

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

जाक्र.पुजिप/माध्य/प्र.मा/ ३८३२/२१

दिनांक:- ०८ /०६/२०२१

परवानगी वर्ष-२०१८-१९
परवानगी प्रकार- दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-२०२०-२१

## स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा
## प्रथम मान्यता

प्रति,

१. मुख्याध्यापक/प्राचार्य, पोदार इंटरनॅशन स्कुल, उबाळेनगर वाघोली ता. हवेली जि पुणे

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.**
**(इयत्ता-९ वी १० वी प्रथम)**

**संदर्भ :-** १.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२.
२. शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.१४२/एस.एम-२ दि.१४ जुलै,२०१७.
३. शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र जाक्र.उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
**४. शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१९/ प्र.क्र.४१६/एसएम-२ दिनांक. ११ जुन ,२०१९.**
**५. संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक-२०/०५/२०२१.**
**६. श्रीम. सुनंदा वाखारे, शिक्षणाधिकारी** हेच कार्या यांचा दिनांक. /०५/२०२१ रोजीचा अहवाल.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग (इयत्ता व शाखा) | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१७/ प्र.क्र.५८५/एसएम-२ दिनांक. २७ डिसें ,२०१७. | पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टर्स ट्रस्ट, मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कुल, उबाळेनगर वाघोली ता. हवेली जि पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | इ ९ वी प्रथम<br>इ १० वी प्रथम | २०२०-२१<br>२०२१-२२ | |
| यादीतील क्रमांक — स्वतंत्र आदेश | | UDISE- २७२५०५०८६३९ | | | | | |

### अटी व शर्ती-

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.

५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.

७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

८. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.

९. वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११. शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.

१३. शासनाचे वतीने एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४. याद्वारे ज्या वर्गांना स्वयंअर्थसहायित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.

१६. शाळा बंद करणे- शासनास किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्त्वावर स्थापन केलेली शाळा बंद करता येणार नाही.

१७. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने नि[illegible] केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.

१८. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

a. शाळेमध्ये पुरेशी व सुयोग्य अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. (Fire Audit)

b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत

c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

d. शाळेची इमारत, सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.

e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)

f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९. संदर्भ क्र.२- शासन निर्णय दि.१४/०७/२०१७ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१२/०२/२०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०. **सदरची प्रथम मान्यता** ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षांकरिता लागू असेल. त्यानंतर **कायम मान्यता** घेण्यात [illegible] शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल.

२१. पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने, या आदेशातील व इतर कायद्याने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**२२. प्रथम मान्यता आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत खाते मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. अन्यथा सांकेतांक क्रमांक मिळणे बाबतची कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

7.6.21

**(सुनंदा वाखारे)**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**प्रत, माहितीस्तव,**

**१. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१.**

**२. मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५.**

महाराष्ट्र स्वंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-२०१३/(८५/१३) (II) /माशि-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१३

संदर्भ :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - १, दिनांक ०४ जानेवारी, २०१३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ६, दिनांक १९ जानेवारी, २०१३.
३) शासन निर्णय क्रमांक पाशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३.
५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५७, ५८ व ५९, दिनांक २० एप्रिल, २०१३.
६) शासन निर्णय क्रमांक स्वयंअ - २०१३ / (८५/१३)/माशि - १, दिनांक १५ जून, २०१३
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक -२४, दिनांक २ जुलै, २०१३

प्रस्तावना :-

राज्यामध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाकरीता राज्य शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी " महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ " पारित केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ पासून करण्यात आली आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने नवीन शाळांना मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे इत्यादी साठी फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या ७,१०८ अर्जांची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ प्रस्ताव पात्र करण्यात आले होते.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ साठी पात्र प्रस्तावांची छाननी करीत असतांना निदर्शनास आलेल्या त्रुटी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आलेल्या अडचणी यांचा विचार करता उक्त अधिनियमांच्या काही कलमांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव दिनांक ०५

PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI, PUNE 412207. PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI, PUNE 412207

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता पहिली पासून परवानगी देण्यात येईल.

५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतूदींनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील (अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळा वगळून) त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करण्यास पात्र ठरलेल्या त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिकरीत्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI, PUNE 412207.

PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI, PUNE 412207.

पृष्ठ ...

PODAR INTERNATIONAL SCHOOL

जून, २०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या सदर बैठकीत विभागाच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानुसार विधी व न्याय विभागाच्या सहमतीनंतर त्या संदर्भातील अध्यादेश मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर दिनांक ०२ जूलै, २०१३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रख्यापित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांनी नवीन शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी अर्ज दाखल केले होते. परंतू, अधिनियमातील तरतूदींच्या पुर्ततेअभावी त्यांचे प्रस्ताव अपात्र ठरले होते. अशा संस्थांच्या बाबतीत उपरोक्त अध्यादेशातील सुधारित तरतुदींची पूर्तता करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात छाननी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून त्याबाबतचे सुधारित प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता ८२८ एवढे प्रस्ताव पात्र करण्यात आलेले आहेत. या पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

वरील पार्श्वभूमीवर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन शाळा सुरु करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता छाननी समितीत्यांकडून कलम ६ (१) अनुसार प्राप्त झालेल्या जिल्हानिहाय अहवालाच्या अनुषंगाने उक्त अधिनियमातील विविध तरतूदी तसेच दिनांक ०२ जूलै, २०१३ च्या अध्यादेशामधील तरतूदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे ८२८ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

२) शाळा दर्जावाढीच्या १९१ पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबची परवानगी देण्यात येत आहे.

३) नवीन शाळांचे प्रस्ताव - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या ६३७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) त्याप्रमाणे उपरोक्त संबंधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापकांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित अधिका-यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या

PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI PUNE 412207
PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI PUNE
PODAR INTERNATIONAL SCHOOL

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता पहिली पासून परवानगी देण्यात येईल.

५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतूदींनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील (अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळा वगळून) त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करण्यास पात्र ठरलेल्या त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिकरीत्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

PODAR INTERNATIONAL SCHOOL WAGHOLI PUNE 412207

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २०६ | पुणे | कला प्रसार शिक्षण संस्था भरणेवाडी ता. इंदापूर जि.पुणे. | क्रियेटिव्ह माईडलेस अॅकेडमी भरणेवाडी ता. इंदापुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०७ | पुणे | सिध्देश्वर प्रतिष्ठान को-हाळे ता. बारामती जि.पुणे. | सिध्देश्वर पब्लिक स्कुल को-हाळे ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०८ | पुणे | पश्चिम महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट पुणे-२ | प.म.एज्यु.ट्रस्टची इंग्रजी प्राथमिक शाळा, गणेश पेठ पुणे-२ | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०९ | पुणे | राजमाता अहिल्यादेवी शिक्षण संस्था, चिखली पुणे. | विश्वरत्न इंग्लिश मेडियम स्कुल, ताम्हाणेवस्ती चिखली. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१० | पुणे | बालाजी शिक्षण संस्था ,मोरेवस्ती ,चिखली ता. हवेली जि.पुणे. | बालाजी इंग्लिश मेडियम स्कुल ताम्हाणेवस्ती ता. हवेली जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २११ | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, ता.मावळ | प्रतिक विद्यानिकेतन, निगडे, ता.मावळ | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१२ | पुणे | माऊली प्रतिष्टान, बधेनगर, कोंढवा बुद्रुक, पुणे-४८ | मारुती बधे मेमोरियल स्कूल, स.नं.५४, बधेनगर, कोंढवा बु. पुणे-४८ | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१३ | पुणे | ज्ञान विज्ञान आणि क्रांती विकास प्रतिष्ठान पुणे | जोतीलींग इंग्लिश मिडियम स्कुल निरा ता.पुरंदर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१४ | पुणे | पोदार एज्युकेशन अँड स्पोर्ट्स ट्रस्ट, परेल, मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कूल, उबाळेनगर, वाघोली, ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१५ | पुणे | यशोवेध चॅरिटेबल संस्था, शिंदेवाडी, कासार-आंबोली | एलीट इंटरनॅशनल स्कूल, मौजे कासार आंबोली, ता.मुळशी | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१६ | पुणे | भिमाशंकर शिक्षण संस्था आंबेगाव जि.पुणे. | दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील न्यू इंग्लिश स्कुल आंबेगाव जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २१७ | पुणे | प्रज्ञानप्रबोधिनी, म्हेत्रेवस्ती, चिखली, ता.हवेली, जि.पुणे | प्रज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडीयम स्कूल, गट नं.१५९७, म्हेत्रवस्ती, ता.हवेली, जि.पुणे | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | प्राथमिक |
| २१८ | पुणे | समर्थ शिक्षण मंडळ, मोरया गोसावी राजपार्क केशवनगर चिंचवड पुणे-३३ | केशवनगर चिंचवड पुणे | मराठी | नवीन | पात्र | माध्यमिक |
| २१९ | पुणे | पश्चिम महाराष्ट्र एज्यु.ट्रस्ट कोंढवा पुणे | मिठानगर कोंढवा खुर्द | मराठी | नवीन | पात्र | माध्यमिक |

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना/ विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवविन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८३/एस.एम-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ६ मे, २०१७

**संदर्भ -**

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/१३६२, दि. ३१/०३/२०१७

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये पोद्दार एज्युकेशन ट्रस्ट, ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई -१२ व पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस ट्रस्ट, ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल मुंबई - १२ या संस्थांचे ७ नविन शाळा व २ दर्जावाढ प्रस्तावास स्वयंअर्थसहांय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रातील ७ नविन शाळा व २ दर्जावाढ प्रस्तावास सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२.२ अटी व शर्ती -**

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition)

घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय उपसंचालक यांची राहील.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा " म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(संतोष गायकवाड)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., नागपूर / बुलढाणा / अहमदनगर / रत्नागिरी/वाशिम /ठाणे /पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर / पुणे / मुंबई / नागपूर / कोल्हापूर / अमरावती
७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर / बुलढाणा / अहमदनगर / रत्नागिरी / वाशिम / ठाणे / पुणे
८. शिक्षण निरिक्षक (उत्तर), मुंबई
९. निवडनस्ती (एस.एम.२)

| महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावांची यादी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८३/एस.एम-२, दिनांक ६ मे, २०१७ चे सहपत्र | | | | | | | |
| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नविन शाळा / दर्जावाढ | मंडळ संलग्नता | प्रकार | माध्यम |
| १ | नागपूर | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, कोरोडी, सर्व्हे नं. ३८१, मौजे गोधानी, पी.एस.के. १२ तह. नागपुर ग्रामीण जि. नागपुर | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २ | बुलढाणा | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. ६७, मौजा माळविहिर, खामगाव रोड जि. बुलढाणा | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ३ | अहमदनगर | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. ४७/२ ए, मौजे केडगाव जि. अहमदनगर | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ४ | रत्नागिरी | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. २६ ब, सिध्दीविनायक रेगालिया, कुंवरबाव (रविंद्रनगर) ता. जि. रत्नागिरी | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ५ | वाशिम | पोदार एज्युकेशन ॲण्ड सोर्प्टस ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. ११६, झाकालवाडी, अकोला रोड, वाशिम जि. वाशिम | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ६ | ठाणे | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. १५९/१ व २, | नवीन शाळा | सी.आय.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |

| महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावांची यादी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१८३/एस.एम-२, दिनांक ६ मे, २०१७ चे सहपत्र | | | | | | | |
| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नविन शाळा / दर्जावाढ | मंडळ संलग्नता | प्रकार | माध्यम |
| | | ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | कोलशेत व्हिलेज, हिरानंदानी इस्टेट, ठाणे | | | | |
| ७ | मुंबई (उत्तर) | पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. २४ ए, हिरानंदानी पार्क, पवई, मुंबई | नवीन शाळा | सी.आय.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ८ | पुणे | पोदार ॲण्ड एज्युकेशन स्पोर्टस ट्रस्ट, ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. २२/७०, उबाले नगर, वाघोली, जि. पुणे | दर्जावाढ | सी.बी.एस.ई | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी) | इंग्रजी |
| ९ | ठाणे | पोदार एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस ट्रस्ट ८५ चमारबांग पोस्ट ऑफिस लेन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई - १२ | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं. ३, हिस्सा नं. ९, माहन प्लाजा, वायले नगर, खडकपाडा, कल्याण (प) कल्याण जि. ठाणे, | दर्जावाढ | सी.बी.एस.ई | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इ. ९ वी ते १० वी) | इंग्रजी |

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.८५८/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ डिसेंबर, २०१७

<u>प्रस्तावना -</u>

पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस् ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं. २२/७०, उबाले नगर, वाघोली, जि. पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत पोदार एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस् ट्रस्ट, मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सर्व्हे नं. २२/७०, उबाले नगर, वाघोली, जि. पुणे या शाळेस (उच्च प्राथमिक शाळेस जोडून माध्यमिक, इयत्ता ९ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

Scanned by CamScanner

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल

(३) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(६) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

Scanned by CamScanner

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा. म. नानल

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पुणें
७. निवडनस्ती (एसएम-२)

Scanned by CamScanner